## थोडक्यात...

# डॉ. ऋत्विक दिपक रोकडे यांना एमबीबीएस पदवी प्रदान



(सिध्देश्वर गिरी/दै.धर्मयोध्दा)

**पुणे -** शासकीय आयटीआय मानवत येथील भांडारपाल दीपक रोकडे यांचे चिरंजीव डॉ. ऋत्विक दीपक रोकडे यांनी पुणे येथील शासकीय बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएसचे शिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. दिनांक ९ एप्रिल २०२६ रोजी आयोजित दीक्षांत समारंभात त्यांना एमबीबीएस पदवी प्रदान करण्यात आली.

विशेष म्हणजे, मागील आठवड्यातच त्यांचे बंधू डॉ. प्रतीक रोकडे यांनी चिपळूण (जि. रत्नागिरी) येथून एमबीबीएस पदवी संपादन केली होती. त्यामुळे रोकडे कुटुंबातील दोन्ही सुपुत्र वैद्यकीय अधिकारी झाल्याने कुटुंबियांसह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या यशाबद्दल वडील दीपक रोकडे व आई सौ. प्रतिमा रोकडे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. दीक्षांत समारंभ प्रसंगी सौ. अपूर्वा महिंद्रकर व विपूल महिंद्रकर उपस्थित होते.

# ज्ञानोपासक मध्ये महामानवास अभिवादन




(गणेश सवणे/दै.धर्मयोध्दा)

**सेलू -** तालुक्यातील ज्ञानोपासक विद्यालय कुपटा येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक आर पी तलवारे. ज्येष्ठ शिक्षक सी के चरचरे .एस जी शेख. एस पी इंगळे. एस टी पाडळसे. व्ही बी पवार. पी एस काठोळे. पी एस अंभूरे. जी इ गोरे. आर एम राऊत. डि के कपाटे.जे पी शिंदे. एस ए भोसले.आर बी घुगे. ए यु चट्टे.जी ए शिंदे. शिक्षकेतर कर्मचारी आर एस पिंपळे. एस आर घोडके. जी बी गिरी. इत्यादी उपस्थित होते




**बोरी- ज्ञानोपासक विद्यालय बोरी येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांची जयंती उत्साहात साजरी केली. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका दुर्गा देशमुख सांस्कृतिक प्रमुख पंढरीनाथ लांडगे उदय निकम राजेश ढोबळे प्रशांत भरणे माणिकराव ढोले रवी कदम आदी**

## वाढत्या तापमानाने नागरिक हैराण

**परभणी :** देशात वाढत्या तापमानामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. अनेक शहरांमध्ये तापमान ४० अंशांच्या वर गेले असून उष्णतेची लाट तीव्र होत आहे. हवामान विभागाने नागरिकांना दुपारी बाहेर पडणे टाळण्याचा सल्ला दिला आहे. पाण्याचे सेवन वाढवून काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे एखादे जरी तत्त्व अंगीकारले तर जीवनाचे कल्याण होते- जिल्हाधिकारी राहुल गुप्ता

(महेंद्र पुरी/दै.धर्मयोध्दा)

**हिंगोली -** डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन कार्य हे सर्वांसाठी प्रेरणादायी आहे ते एक महान तत्त्वज्ञानी होते, त्यांचं एखादं जरी तत्त्वज्ञान आत्मसा त करून जीवनात अंगीकारले तर जीवनाचे कल्याण होते असे प्रतिपादन हिंगोली जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले. हिंगोली येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरामध्ये १३५ व्या सार्वजनिक आंबेडकर जयंती चे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता हे होते. अध्यक्षीय भाषणात पुढे बोलताना जिल्हाधिकारी गुप्ता म्हणाले की, आज सर्वत्र बाबासाहेब आंबेडकरांची जयंती मोठ्या हर्ष उल्हासात साजरी होत आहे.आजच्या दिवशी प्रत्येकांनी स्वतःचे जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी डॉ. आंबेडकरांचे एक तरी संदेश



किंवा तत्व अंगी करण्याचा संकल्प करावा असे आवाहन करून ते म्हणाले की त्यांनी सांगितलेल्या शिक्षणाचे तत्व मी अंगीकारून या पदावर पोहचलो तेव्हा प्रत्येक व्यक्ती साठी आंबेडकर हे महान आहेत. याप्रसंगी जि. प.मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड व पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन त्यांनीही आपल्या भाषणात आंबेडकर जयंतीच्या उपस्थितांना शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले.या कार्यक्रमास वरील मान्यवरांसह प्रमुख पाहुणे म्हणून अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील ठोंबरे, उपविभागीय अधिकारी समाधान घुतुकडे, वैद्यकीय महाविद्यालय अधिष्ठाता डॉ. चक्रधर मुंगल, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त गीता गुट्टे, जात पडताळणी संशोधन अधिकारी सुनील खामितकर, पत्रकार डॉ.विजय निलावार, कल्याण देशमुख, विक्रम जावळे वाय.बी.मुळे,के. जे.आरगडे, माधव भालेराव, इंदुमती मोमडे, शांताबाई मोरे,शांताबाई भालेराव आदींसह पुतळा समिती व जयंती समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुरुवातीला प्रास्ताविक भाषण मधुकर मांजरमकर यांनी केले तर सूत्रसंचालन पत्रकार प्रकाश इंगोले यांनी केले, शेवटी आभार ऍड.दीपक मांजरमकर यांनी मानले. उपस्थित सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी पुतळा समितीचे अध्यक्ष मधुकरराव मांजरमकर हे या वयात हि तरुणांना लाजवेल असे कार्य करतात त्याबद्दल यांचा सत्कार केला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकाश कांबळे, ईश्वर जावळे, यशवंत ठोंबरे, आनंद टापरे अदिनी परिश्रम घेतले. तळपत्या उन्हात ही कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## उजळआंबा येथे महात्मा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंतीनिमिताने शोभायात्रा



**परभणी -** तालुक्यातील उजळंबा येथे महात्मा ज्योतिबा फुले व बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती,मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी गावातील सर्व तरुण, युवक, विद्यार्थी, शिक्षक यांनी सहभाग घेतला होता. क्रांतीज्योती महात्मा फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून गावातून शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे वेशभूषा करून सामाजिक एकोपेचा संदेश दिला तसेच काही विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप करण्यात आले. सर्व गावकऱ्यांच्या वतीने महाप्रसादाचे देखील आयोजन करण्यात आले होते. गावातील सर्व महिला मंडळ, पुरुष मंडळ, युवक, विद्यार्थी, शिक्षक यांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी गावातील युवकांनी परिश्रम घेतले..

## श्री स्वामी समर्थ केंद्रात नेत्र तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन परभणी मेडिकल कॉलेजचा पुढाकार

**परभणी-** आ.डॉ.राहुल पाटील यांच्या पुढाकारातून परभणी मेडिकल कॉलेज, आर.पी हॉस्पिटल अँड रिसर्च इन्स्टिट्यूटच्या वतीने परभणी शहरातील चारही श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात बुधवार दिनांक १५ रोजी नेत्र तपासणी आणि रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सध्या शहरातील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात गुरुचरित्र पारायण सुरू आहे याचे औचित्य साधून आ.डॉ.राहुल पाटील यांनी पुढाकार घेऊन बुधवार १५ रोजी सकाळी ८ ते दुपारी ३ या वेळेत विकास नगर, शिवाजीनगर, रामकृष्ण नगर आणि सिंचन नगर येथील दिंडोरी प्रणित श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात नेत्र तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. शिबिराचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन आ. पाटील व मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ.प्रमोद शिंदे यांनी केले.

## लोहा स्टेट बँकेचे एटीएम दीड महिन्यापासून बंद; हजारो ग्राहकांची कुचंबना!

**लोहा -** शहरातील स्टेट बँक ऑफ इंडिया सध्या चर्चेत असून ग्राहकांच्या विविध समस्यां दिवसेंदिवस वाढत चालल्याचे विदारक चित्र समोर येत असून तालुक्यातील शेकडो गावे अवलंबून असलेल्या या स्टेट बँकेचे एटीएम गत दीड महिन्यापासून बंद अवस्थेत असल्याने ग्राहकांची प्रचंड गैरसोय होत आहे परिणामी ग्राहकातून तीव्र असंतोष व्यक्त होत आहे.

राष्ट्रीय महामार्गांवर वसलेल्या लोहा शहरांची वाढ अगदी झपाट्याने झाली. त्यात स्टेट बँक ऑफ इंडियामुळे प्रारंभी शहराच्या लौकीकात भर पडली मात्र आता चित्र उलट निर्माण झाले आहे. लोहा स्टेट बँकेचे एटीएम हे नेहमी बंद अवस्थेत असते.त्यामुळे पैसे काढण्यासाठी ग्राहकांना रांगेत उभे राहून बँकेतून कॅश काढावी लागत आहे. त्यामुळे बँकेत रांग वाढत असून ग्राहकांना वेळेवर पैसे मिळणे दुरापास्त झाले आहे. या बाबतीत बँकेच्या वरिष्ठाना बोलून देखील काहीही उपयोग होत नसल्याने ग्राहक पुरते वैतागले आहेत.एटीएम बंद असल्यामुळे वेळेवर ग्राहकांना पैसे काढणे अवघड होऊन बसले आहे.त्यामुळे बँकेच्या या उदास कार्यप्रणाली विरोधात ग्राहकातून तीव्र संताप व्यक्त होत आहे. सदरील बंद अवस्थेतील एटीएम तत्काळ चालू करावे अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा ग्राहकांनी दिला आहे.

# चिराग शहा तलावाचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करा सीईओ विवेक गायकवाड यांचे कंत्राटदाराला खडे बोल

(महेंद्र पुरी/दै.धर्मयोध्दा)

**हिंगोली-** शहराच्या वैभवात भर टाकणाऱ्या रिसाला बाजार भागातील ऐतिहासिक चिराग शहा तलावाच्या कायापालटाचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. या कामाच्या प्रगतीची पाहणी करण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी प्रत्यक्ष तलाव क्षेत्राला भेट दिली. १४ कोटी रुपये निधीतून सुरू असलेले हे काम दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

प्रशासकीय यंत्रणेकडून प्रत्यक्ष पाहणी

या पाहणी दौऱ्यात मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्यासोबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुनील ठोंबरे, जलसंधारण विभागाचे अभियंता आणि कंत्राटदार आसाराम घुगे उपस्थित होते. तलावाचा विस्तीर्ण परिसर लक्षात घेता, कामाचा वेग वाढवण्यावर भर देण्यात आला. सीईओ गायकवाड यांनी कंत्राटदाराला स्पष्ट आदेश



दिले की, ''हा तलाव १४८ एकर परिसरात पसरलेला आहे. आगामी पावसाळा लक्षात घेता, त्यापूर्वीच महत्त्वाची कामे पूर्ण करा, जेणेकरून कामात कोणताही अडथळा येणार नाही आणि पाणी साठवणूक क्षमता वाढेल.''

आमदार मुटकुळे यांचा पाठपुरावा आणि पालकमंत्र्यांचा निधी

हिंगोली शहराचा कायापालट करण्यासाठी जिल्ह्याचे कार्यसम्राट आमदार तानाजीराव मुटकुळे यांनी या तलावाच्या पुनरुज्जीवनासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या या मागणीची दखल घेत जिल्ह्याचे पालकमंत्री नरहरी जिरवाळ यांनी १४ कोटी रुपयांचा भरघोस निधी मंजूर केला आहे. लोकप्रतिनिधींच्या या प्रयत्नांमुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न आता मार्गी लागत आहे.

परिसराचा होणार कायापालट

चिराग शहा तलावाच्या सौंदर्यीकरणामुळे चिराग शहा दर्गा परिसराच्या सौंदर्यात आणि वैभवात मोठी भर पडणार आहे. या प्रकल्पामुळे:

पर्यटनात वाढ: शहरात पर्यटकांची संख्या वाढून स्थानिकांना रोजगाराच्या संधी मिळतील.

निसर्गरम्य परिसर: १४८ एकरचा हा परिसर शहरासाठी एक नवीन ऑक्सिजन हब ठरेल.

जलसंधारण: मोठ्या प्रमाणात पाणीसाठा झाल्यामुळे परिसरातील विहिरींच्या पाणीपातळीत वाढ होईल.

हे काम लवकरात लवकर पूर्ण करून हिंगोलीकरांना एक उत्तम पर्यटन स्थळ उपलब्ध करून देण्याचा मानस प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# जाणिवा आणि संवेदना जाग्या ठेवा- व्याख्याते यजुर्वेंद्र अनिल महाजन तालुकास्तरीय शिक्षण परिषद व गुणगौरव सोहळ्यानिमित्य जिंतूरात व्याख्यानाची वैचारिक मेजवानी

(संतोष तायडे/ दै.धर्मयोध्दा)

**बोरी-** या भव्य कार्यक्रमाच्या उद्घाटक महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्री तथा पालकमंत्री परभणी सौ मेघना दीदी साकोरे बोर्डीकर यांच्या प्रेरणेतून गटशिक्षणाधिकारी कार्यालय पंचायत समिती जिंतूर, संजरी बिल्डर्स अॅन्ड डेव्हलपर्स व दीपस्तंभ प्रतिष्ठाण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय शिक्षण परिषद, गुणगौरव पारितोषिक वितरण व प्रेरणादायी व्याख्यान सोहळा दि. १३ एप्रिल २०२६ रोजी श्री राधाकृष्ण मंगल कार्यालय ग्रीन पार्क-२ जिंतूर येथे भव्य-दिव्य, दिमाखदार, नियोजनबद्ध, उत्स्फूर्त व उदंड प्रतिसादात, उत्साहात संपन्न झाला. ''प्रत्येक विद्यार्थ्यांचा पंचकोश विकास... हाच आमचा ध्यास...!'' या उदात्त ध्येयाच्या प्राप्तीसाठी गटशिक्षणाधिकारी कार्यालय पंचायत समिती जिंतूर द्वारा वर्षभर आयोजित विविध शालेय शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेमध्ये विजयी झालेल्या व विशेष उल्लेखनीय



कार्य केलेल्या विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक करण्यासाठी आणि सर्वांना कार्यप्रेरणा देण्यासाठी तालुकास्तरीय शिक्षण परिषदेचे औचित्य साधून संजय बिल्डर्स अँड डेव्हलपर्स जिंतूर, दीपस्तंभ प्रतिष्ठान जिंतूर, राधाकृष्ण मंगल कार्यालयाचे मालक कैलासराव आदमाने, अरुण बाबुराव शहाणे ज्वेलर्स, सुधीर शहाणे यांचे कृष्णा ज्वेलर्स, शिवाजीराव कदम, राजेश चव्हाण यांच्या विशेष सहकार्यातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

हा सोहळा व्याख्याते यजुर्वेंद्र महाजन आंतरराष्ट्रीय वक्ते तथा संस्थापक दिपस्तंभ फाऊंडेशन मनोबल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि प परभणी श्रीमती रश्मी खांडेकर, सभापती पंचायत समिती जिंतूर सौ. अयोध्याताई किशोर खिस्ते, नगराध्यक्ष नगरपरिषद जिंतूर प्रतापराव देशमुख, उपसभापती पं. स. जिंतूर सौ. सोनाली माधव दराडे, जि प सदस्य रोहित चव्हाण, जि प सदस्य भगवानराव वटाणे, प्राचार्य डायट परभणी डॉ सुदर्शन चिटकुलवार, शिक्षणाधिकारी योजना डॉ. प्रल्हाद खुणे, गटविकास अधिकारी सुभाष मानकर, गोविंदराव थिटे, शिवाजीराव कदम, भास्करराव ठोंबरे, बालाजीराव सांगळे, शिवाजीराव काळे, अब्दुल नाफे संजरी बिल्डर्स अॅन्ड डेव्हलपर्स, विराज बोर्डीकर दीपस्तंभ प्रतिष्ठाण यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याच्या प्रयत्नातून विविध उपक्रम, कार्यक्रम, स्पर्धा राबवताना लोकसहभागातून एक शैक्षणिक लोकचळवळ उभी करता आली. थोडीशी मदत मागितली तर समाजाकडून भरभरून मदत मिळाली याचा मनस्वी आनंद वाटतो. असे प्रास्ताविक करताना गटशिक्षणाधिकारी त्र्यंबक पोले म्हणाले

शारीरिक, मानसिक, भावनिक, आर्थिक दृष्टीने जन्मतः आपल्याला काय मिळाले ? कसे मिळाले ? आणि किती मिळाले ? यापेक्षा आहे त्या परिस्थितीमध्ये आपल्याला काय करता येऊ शकते? याचे चिंतन, याचा विचार आणि प्रत्यक्ष कृती आणि सातत्याने केलेल्या प्रयत्नातून शारीरिक दिव्यांगत्व असणारे विद्यार्थी सुद्धा उच्च पदापर्यंत पोहोचू शकतात. आपले जीवन यशस्वी करू शकतात. अशा कित्येक दिव्यांग, अनाथ, गरीब होतकरू विद्यार्थ्यांना मी माझ्या दीपस्तंभ फाऊंडेशन मनोबल या संस्थेत घडवण्याचा प्रयत्न केला आहे. घडताना पाहिले आहे. त्यांना घडविले आहे. ''दिव्यांग व्यक्ती नसतात तर दिव्यांग असतात समाजाच्या नजरा'' त्यामुळे कोणत्याही परिस्थितीला दोष न देता प्राप्त परिस्थितीमध्ये भरपूर प्रयत्न करा, निराधार, दिव्यांग आणि गरजूंचा आधार बना. त्यांचे मनोबल वाढवा. आपण स्वतः घडा आणि इतरांना घडण्यासाठी मदत करा. आपल्या मानवी हृदयातील जाणीव आणि संवेदना जिवंत ठेवा, जागृत ठेवा. असे आपल्या हृदयस्पर्शी व्याख्यानामध्ये व्याख्याते यजुर्वेंद्र अनिल महाजन म्हणाले.

या भव्य सोहळ्यात जवळपास १७५० विद्यार्थी, शिक्षक यांना ३५० सन्मानाद्वारे सन्मानित करण्यात आले. या भव्य कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साहित्यिक मयूर जोशी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजेंद्र ढाकणे, केशव घुगे, दिलीप रेंगे, प्रकाश पांडे, डी यू राठोड, मारुती घुगे, दिनकर घुगे, पांडुरंग भांबळे, देवानंद सावंत, निलेश लटपटे, माधव धोसलवार, कैलास गवई, मनोज तोडकर, संजय स्वामी, दिलीप साबळे, कपिलकुमार देवडे, सचिन हजारे, शंकर माने, विष्णु शिंदे, हिरामण वाघमारे, प्रवीण कोटगिरे, योगेश देशमुख, जयसिंग जाधव, अनिल स्वामी, गजानन कुरे, नितीन पेठे यांच्यासह सर्व मुख्याध्यापक, शिक्षक यांनी मेहनत घेतली

# पोहनेरचा सुपुत्र डॉ. शुभम काकडे गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा!

(बालासाहेब काळे/ दै.धर्मयोध्दा)

**पोहनेर-**पोहनेर (ता. परळी) गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी अभिमानास्पद घटना नुकतीच घडली असून, डॉ. शुभम काकडे यांच्या एमबीबीएस पदवीप्राप्तीमुळे संपूर्ण गावात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. अत्यंत साध्या व ग्रामीण पार्श्वभूमीतून शिक्षणाचा ध्यास घेत शुभमने जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमांच्या जोरावर हे यश संपादन करत गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. दि. १३ रोजी स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई येथे आयोजित समारंभात शुभम काकडे यांनी एमबीबीएस पदवी यशस्वीरित्या पूर्ण केली. या यशामुळे माजलगाव तालुक्यासह परळी तालुक्यातील पोहनेर गावाचा मान उंचावला आहे.



विशेष म्हणजे, पुणे सारख्या शहरातील नव्हे तर ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेत प्राथमिक शिक्षण घेत शुभमने आपल्या कष्टांच्या बळावर वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षणाची कास धरत त्याने हे यश मिळवले, ही बाब इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. शुभमच्या या यशाबद्दल पोहणेर ग्रामस्थांमध्ये मोठा आनंद व्यक्त करण्यात आला. गावात अनेक ठिकाणी आनंदोत्सव साजरा करण्यात आला असून, ग्रामस्थांनी शुभमचे अभिनंदन करून त्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ''आपल्या गावातील मुलगा डॉक्टर झाला'' या भावनेने गावकऱ्यांमध्ये अभिमानाची भावना दाटून आली आहे. ग्रामीण भागातून शिक्षण घेऊनही मोठे यश संपादन करता येते, हे शुभम काकडे यांनी आपल्या कर्तृत्वातून सिद्ध केले आहे. त्यांच्या या यशामुळे परिसरातील युवकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती साधण्याचा संदेश त्यांच्या कार्यातून मिळत आहे.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao